विषयः-विभागीय खातेनिहाय चौकशीच्या अनुषंगाने चौकशी अहवालाची प्रत सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेने अपचारी यांना देण्याबाबत.

सातारा जिल्हा परिषद, सातारा
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक
जा.क्र.साप्रवि/आस्था-२(२)/६६०ई/२०२१
दिनांकः- ३० जुलै,२०२१
०४/०८/२०२१

या परिपत्रान्वये सातारा जिल्हा परिषद अंतर्गत सर्व खाते प्रमुख, व सर्व संबंधित सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना कळविण्यात येते की, सातारा जिल्हा परिषद अंतर्गत विभागीय खातेनिहाय चौकशीच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या चौकशी अहवालाची प्रत संबंधित अपचारी कर्मचारी यांना देण्यात येत नसल्याची बाब माझ्या निदर्शनास आलेली आहे. सदरची बाब योग्य नाही.

सबब सदर विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार सातारा जिल्हा परिषद अंतर्गत प्राप्त होणा-या विभागीय खातेनिहाय चौकशीच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या चौकशी अहवालाची प्रत संबंधित अपचारी कर्मचारी यांना शास्तीपुर्व अंतिम कारणे दाखवा नोटीशी देता वेळी अंतिम कारणे दाखवा नोटीशीसोबत त्यांचे बचावाचे म्हणणे सादर करण्याकामी सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेने देण्याची कार्यवाही करावी, यामध्ये कोणत्याही प्रकारे हलगर्जीपणा अथवा नियमांचे उल्लंघन झाल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधिताविरूध्द जबाबदारी निश्चित करून शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(विनय गौडा जी सी) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा

प्रतः- सर्व संबंधित खातेप्रमुख, जि.प.सातारा यांना पुढील कार्यवाहीसाठी..

Scanned with CamScanner